**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,**
५वा मजला, फाऊंटन दूरसंचार भवन-२,
महात्मा गांधी मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी क्रमांक ०२२-२२६१४७२६
Email ID - dycommr.admin@gmail.com

---

**सेवानिवृत्त अधिका-यांची सेवा करार पध्दतीने विविक्षित कामासाठी घेणेबाबत.**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७.१२.२०१६ अनुसार परिवहन आयुक्त यांचे कार्यालय येथे खाली नमुद केल्यानुसार सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा विविक्षित कामासाठी करार पध्दतीने घेण्यासाठी दिनांक २०.१०.२०२० पर्यंत लेखी अर्ज खाली नमुद पत्त्यावर अथवा Email ID - **dycommr.admin@gmail.com** व **dytcadmin.tpt-mh@gov.in** वर सादर करावेत. अर्जाचा नमुना व इतर तपशिल व अटी **www.transport.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर व परिवहन आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई येथे उपलब्ध आहे.

| **रस्ता सुरक्षा शिर्ष संस्थेकरीता "वरिष्ठ सल्लागार" हे पद १ वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत** | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **सेवानिवृत्तीचे वेळी धारण केलेले पद/वेतनश्रेणी** | **अनुभव** | **पदांची संख्या** |
| १ | महाराष्ट्र शासनाच्या मोटार वाहन विभागातून सह परिवहन आयुक्त अथवा त्यावरील पदावरुन निवृत्त झालेले अधिकारी किंवा महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागातील / महामंडळातील ७ व्या वेतनआयोगातील वेतनश्रेणी एस २५ रु. ७८८०० - २०९२०० (६ व्या वेतन आयोगानुसार रु. १५६००-३९१०० ग्रेडवेतन ७६०० ) अथवा त्यापेक्षा जास्त वेतनश्रेणीतील मेॅकनिकल इंजिनियरींग / ऑटोमोबाईल इंजिनियरिंग पदवी ही तांत्रिक अर्हता धारण केलेले वर्ग १ चे सेवानिवृत्त अधिकारी | रस्ता सुरक्षाविषयक कामकाजाचा तसेच मोटार वाहन कायदा, केंद्रिय मोटार वाहन नियम व महाराष्ट्र मोटार वाहन नियमांचा किमान तीन वर्षांचा अनुभव | १ |

**पत्रव्यवहाराचा पत्ता : परिवहन आयुक्त यांचे कार्यालय, ५वा मजला, फाऊंटन दूरसंचार भवन-२, महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.**

**इतर सर्वसाधारण अटी :**

**१.** अर्जदाराविरुद्ध सेवेत असताना कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी (संबंधित विभागाचे प्रमाणपत्र आवश्यक)

२. उपरोक्त नमूद विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव ही पूर्वअट राहील. (अर्जासोबत अनुभव प्रमाणपत्र जोडावे)

३. विवक्षित कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करुन देण्यात येईल.

४. सदर कामासाठी करार पद्धतीने देण्यात येणारी नियुक्ती एकावेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल. नियुक्तीस मुदतवाढ द्यावयाची झाल्यास केलेल्या कामाचा आढावा घेऊन शासन मान्यतेने दरवर्षी नुतनीकरण करण्यात येईल. तथापि असा सर्व एकूण कालावधी तीन वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.

५. करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

६. सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांची विहित कार्यपद्धतीचे पालन करुन करार पद्धतीने नेमणूक करताना त्यांना अशास नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. सदर पारिश्रमिक त्यांच्या करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्ष) कायम राहील. (अर्जासोबत सेवानिवृत्ती वेतनाबाबत संबंधित कोषागार कार्यालयाचा दाखला, वयाबाबतचा पुरावा सादर करावा.)

७. भत्ते : उक्त तरतुदीनुसार निश्चत होणाऱ्या मासिक पारिश्रमिकाच्या जास्तीत जास्त २५ % इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त "निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दुरध्वनी भत्ता" या सर्व भत्त्यांपोटी प्रतिमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकाऱ्यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा इ. बाबी विचारात घेऊन निश्चित करण्यात येईल.

८. करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेतनास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

९. करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

१०. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

११. नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील. या आशयाचे बंधपत्र/हमीपत्र त्यांचेकडून घेण्यात येईल. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात, करार पद्धतीने नियुक्ती देताना शासनाने या निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा, तसेच करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींकडून नियमीत सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, याचा उल्लेख करण्यात यावा.

१२. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of Interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

१३. नियुक्त अधिकारी त्याच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल. अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

१४. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्र/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

१५. करार पद्धतीने नियुक्त अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील. तसेच, त्यांचे कामकाज असमाधानकारक आढळल्यास त्यांची नियुक्ती त्वरीत रद्द करण्यात येईल.

Sd/-

**परिवहन आयुक्त,**

**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# अर्जाचा नमुना

प्रति,

मा. परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय : **रस्ता सुरक्षा शिर्ष संस्थेकरीता "वरिष्ठ सल्लागार " हे पद १ वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत**

**महोदय,**

वरील विषयाच्या अनुषंगाने मी विनंती पूर्वक अर्ज करतो/करते की, मी शासन, सामान्य प्रशासन विभागाचा निर्णय दिनांक १७.१२.२०१६ मधील अटी व शर्ती पूर्ण करीत असून वरील विषयात नमूद केलेल्या कामाच्या अनुषंगाने काम करण्यास इच्छुक असून माझी खाली नमूद केल्यानुसार माहिती सादर करीत आहे.

१. सेवानिवृत्त अधिकारी यांचे पूर्ण नाव :
२. पत्रव्यवहाराचा पत्ता / संपर्क दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक वEmail.Id
३. सेवानिवृततीच्या वेळी धारण केलेले पद व विभाग :
४. शासकीय सेवेत आल्याचा दिनांक / शासकीय सेवेत आल्यापासून सेवानिवृत्ती पर्यंत धारण केलेली पदे व कार्यालय :
५. सेवानिवृत्तीचा दिनांक
६. अर्जाचा दिनांकास पूर्ण वय :
७. सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेले वेतन
८. अर्जदार सेवानिवृत्त अधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित अथवा प्रलंबित नसल्याबाबतचे संबंधित विभागाचे प्रमाणपत्र
९. विवक्षित कामाच्या अनुषंगाने प्रवास करावा लागल्यास तसे हमी पत्र जोडणे आवश्यक
१०. सद्यस्थितीत मिळत असलेले सेवानिवृत्ती वेतन

**स्थळ :** **अर्जदाराची स्वाक्षरी**

**दिनांक**